पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी ४११०१८

**क प्रभाग समिती**

कार्यपत्रिका क्रमांक-१

सभावृत्तांत

दि.- २८/०४/२०१४ वेळ- दुपारी १२:५० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समितीची सभा सोमवार दिनांक २८/०४/२०१४ रोजी दुपारी १२.५० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा. श्री.कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.ननवरे जितेंद्र बाबा
२) मा.सावळे सिमा रविंद्र
३) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
४) मा.भोसले राहूल हनुमंतराव
५) मा.पालांडे सुजाता सुनिल
६) मा.बहल योगेश मंगलसेन
७) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
८) मा.कदम सदगुरु महादेव
९) मा.गिता सुशिल मंचरकर
१०) मा.शितोळे शैलजा बाबुराव
११) मा.जगताप नवनाथ दत्तु
१२) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
१३) मा.जम सोनाली पोपट
१४) मा.प्रशांत शितोळे
१५) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१६) मा.गायकवाड संध्या सुरदास
१७) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१८) मा.शेंडगे आशा सुखदेव
१९) मा.मोटे किरण बाळासाहेब
२०) मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.दत्तात्रय फुंदे- क्षेत्रीय अधिकारी, क क्षेत्रीय कार्यालय श्री.रामकिसन लटपटे - प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

-------

**मुख्य कार्यकारी अधिकारी (पिठासीन अधिकारी)** - सन्मा.सदस्य, मा. क्षेत्रीय अधिकारी , उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे मा. क प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.**

**मा.प्रशासन अधिकारी तथा- सचिव(सभाशाखा )** मा. क प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण **३** उमेदवारांची **६** नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | जम सोनाली पोपट | शितोळे शैलजा बाबुराव | तनपुरे सुषमा राजेंद्र |
| २. | जम सोनाली पोपट | जगताप नवनाथ दत्तु | प्रशांत शितोळे |
| ३. | मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ | मा.गिता सुशिल मंचरकर | भोसले राहूल हनुमंतराव |
| ४. | मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ | मा.गिता सुशिल मंचरकर | भोसले राहूल हनुमंतराव |
| ५. | सौ.पानसरे अमिना महंमद | ननवरे जितेंद्र बाबा | बहल योगेश मंगलसेन |
| ६. | जम सोनाली पोपट | सावळे सीमा रविंद्र | आशा सुखदेव शेंडगे |

(मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त **३** उमेदवारांची **६** नामनिर्देशनपत्रे मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. मा. पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

**मुख्य कार्यकारी अधिकारी (पिठासीन अधिकारी)** – मा. क प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एकूण **३** उमेदवारांच्या **६** नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आली असून ०५ नामनिर्देशनपत्रे वैध व एक नामनिर्देशनपत्र अवैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा. क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **१) मा.जम सोनाली पोपट २) मा.सौ.पानसरे अमिना महंमद ३) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ** हे **तीन** रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे देवुन त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी १.०५ ते १.२० हा १५ मिनिटांचा कालावधी संपला.)

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी-** उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटाच्या अवधीमध्ये मा. क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा.बनसोडे शकुंतला काशीनाथ व मा.पानसरे अमिना महंमद यांनी दिलेल्या वेळेमध्ये उमेदवारी मागे घेतली असल्याने **मा.जम सोनाली पोपट** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक-१ विषय क्रमांक- १
दिनांक- २८/४/२०१४ विभाग- प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरिता १) मा.जम सोनाली पोपट २) मा.बनसोडे शकुंतला काशिनाथ ३) मा.पानसरे अमिना महंमद या तीन उमेदवारांनी अनुक्रमे तीन, दोन, एक याप्रमाणे एकूण ०६ नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून त्यापैकी ०५ वैध व ०१ अवैध ठरलेली आहे. त्यामधील उमेदवार मा.बनसोडे शकुंतला काशिनाथ व मा.पानसरे अमिना महंमद यांनी त्यांची उमेदवारी दिलेल्या वेळेत रितसर मागे घेतली असल्याने क प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागे करीता **मा.जम सोनाली पोपट** हे एकच उमेदवार असल्याने **मा.जम सोनाली पोपट** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समिती सभापती पदावर बिनविरोध रितसर वैधरीत्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

----

यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**(कांतीलाल उमाप )**
**पिठासीन अधिकारी तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे**

( नवनिर्वाचित सभापती **मा.जम सोनाली पोपट** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

त्यानंतर नवनिर्वाचित **सभापती मा.जम सोनाली पोपट** यांचे अध्यक्षतेखाली विषयपत्रिकेवरील इतर विषय खालीलप्रमाणे मंजूर करणेत आले.

ठराव क्रमांक- **२** | विषय क्रमांक- २
दिनांक- २८/४/२०१४ | विभाग- प्रशासन
सुचक- मा.सीमा सावळे | अनुमोदक-मा.राजेंद्र काटे

क प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या बुधवारी दु. ३.०० वा.** (**पहिल्या** बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेलतर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **सभापती मा. जम सोनाली पोपट** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**(जम सोनाली पोपट )**
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६
क्र-कक्षेका/कावि/७५८ /२०१४
दिनांक- २८/०४/२०१४



प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.